Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१
दूरध्वनी: +९१–२२–२२७८ ५००० • फॅक्स: +९१–२२–२२७८ ५१११ • ई–मेल: investor_relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीच्या सदस्यांची चाळिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (पोस्ट–आयपीओ) शुक्रवार दिनांक २१ जुलै २०१७ रोजी सकाळी ११ वाजता बिरला मातुश्री सभागार, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, बॉम्बे हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेन्टर जवळ, न्यू मरिन लाईन्स, मुंबई–४०० ०२० (''सभा'') येथे होईल.

सभेमध्ये करण्याच्या सामान्य व विशेष कामाची सभेची सूचना आणि ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे कंपनीचे स्वतंत्र आणि एकत्रित लेखापरिक्षित आर्थिक विवरण, त्यावरील लेखापरीक्षकांचा आणि मंडळाचा अहवाल, व्यवस्थापनाची चर्चा आणि विश्लेषण, व्यवसायाच्या जबाबदाऱ्यांचा अहवाल आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा अहवाल ह्यासह कंपनीचा आर्थिक वर्ष २०१६–१७ रोजी संपलेल्या वर्षाचा वार्षिक अहवाल सदस्यांना त्यांच्या नोंदणी केलेल्या पत्यावर पाठविण्यात आला आहे आणि ज्यांनी डिपॉझिटरीज/कंपनीपाशी त्यांचा ई–मेलचा पत्ता नोंदविला आहे अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आला आहे.

सदस्यांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की सभेची सूचना आणि वरील दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **(www.ril.com)** उपलब्ध आहेत आणि वरील दस्ताऐवजांच्या प्रती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या तारखेपर्यंत (शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्या व्यतिरिक्त) सर्व कामकाजाचे दिवशी कामकाजाच्या वेळेत सभेच्या दिवसापर्यंत तपासणीसाठी उपलब्ध असतील.

सभेला हजर राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेला सदस्य स्वत:ऐवजी सभेला हजर राहण्यास आणि मतदानाच्या वेळी पोलद्वारे मतदान करण्यास प्रॉक्सीची नेमणूक करू शकतो आणि प्रॉक्सी कंपनीचा सदस्य असण्याची गरज नाही. प्रॉक्सीची नेमणूक करणारे दस्तऐवज वैध होण्यासाठी ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभा सुरू होण्याच्या किमान ४८ तास अगोदर जमा केले पाहिजेत.

ह्याद्वारे असेही सूचीत करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि लागू होणाऱ्या अन्य नियमांनुसार कंपनीद्वारे २०१६–१७ सालच्या आर्थिक वर्षातील संचालक मंडळाद्वारे शिफारस केलेला लाभांश घेण्यास पात्र असलेल्या सदस्यांची माहिती मिळविण्याकरिता दिनांक १४ जुलै २०१७ नमूद केलेली आहे.

लाभांश मिळावा याकरिता सदस्य आणि इतर भागपत्र स्वरूपात समभाग असलेल्या धारकांना हस्तांतरण, प्रसार इत्यादीसाठी कागदपत्रे कंपनीच्या रजिस्ट्रारकडे म्हणजेच कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद ५०० ०३२ येथे शुक्रवार दिनांक १४ जुलै २०१७ पर्यंत जमा करण्याची विनंती करण्यात येते आहे.

संचालक मंडळाचे आदेशाने
सही/–
**के. सेथुरामन**
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंम्पलायन्स ऑफीसर

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९ जून २०१७